SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 P.G. Admission – 2609142
Fax : +91-231-2691533 & 2692333 Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ४१६ ००४
फोन नं. ईपीबीक्स, २६०९००० पीजी प्रवेश २६०९१४२ फॅक्स नंबर +९१-२३१-२६९१५३३ व २६९२३३३
email: pgadmission@unishivaji.ac.in

Estd. 1962

संदर्भ क्र.शिवाजी वि./पदव्युत्तर प्रवेश/जीपीआर/ 181 दि.१२/११/२०२०

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्न
महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा.अधिविभागप्रमुख/
संचालक/समन्वयक,
पदवी/पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. विद्यापीठ सर्व प्रशासकीय विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :– विद्यापीठातील व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या पाल्यांना विद्यापीठाच्या अधिविभागामार्फत स्वावलंबी तत्वावर सुरू असलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता १०% शैक्षणिक शुल्क (Tuition Fee) माफ करणेबाबत....**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठातील व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या प्रवेशित पाल्यांना विद्यापीठाच्या विविध अधिविभागामार्फत स्वावलंबी तत्वावर सुरू असलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्कामध्ये विद्यापीठातील व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या पाल्यांना विद्यापीठाच्या विविध अधिविभागामार्फत स्वावलंबी तत्वावर सुरू असलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये १०% शुल्क माफ करणेस मान्यता देण्यात आली आहे. तरी खालील प्रमाणे सुधारित नियमावली केली आहे.

१. सदरची योजना ही शिवाजी विद्यापीठ परिसर व परिक्षेत्रातील महाविद्यालयामध्ये / विद्यापीठ अधिविभागामध्ये / कार्यालयामध्ये कार्यरत असणा–या शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या पाल्यांना लागू राहिल.
२. ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनीने विद्यापीठातील स्वावलंबी अभ्यासक्रमास प्रवेश घेताना इतर कोणत्याही शासकीय योजनांचा फी मधील सवलतीसाठी लाभ घेतला असल्यास त्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.
३. अभ्यासक्रमाच्या वार्षिक शैक्षणिक शुल्कापैकी १०% शैक्षणिक शुल्क (Tuition Fee) माफ करण्यात येईल. तसेच सदर फी माफीचा लाभ मिळणा–या संबंधित विद्यार्थ्यांस नियमाप्रमाणे इतर फी (Other Fee & Exam Fee) लागू राहील.
४. सदर योजना लागू करताना एका स्वावलंबी तत्वावर सुरू असलेल्या अभ्यासक्रमामध्ये लाभार्थी संख्या एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांच्या १०% पेक्षा जास्त असल्यास गुणवत्ता यादी तयार करून १०% विद्यार्थ्यांना लाभ देण्यात यावा.

तेव्हा उपरोक्त प्रमाणे सुधारीत नियमावली आपल्या महाविद्यालय/अधिविभाग/विभागात कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या निदर्शनास आणण्यात यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

कुलसचिव

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यावाहीसाठी**

१. मा.कुलगुरू कार्यालय,
२. मा.कुलसचिव कार्यालय,
३. मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन कार्यालय,
४. मा.वित्त व लेखा अधिकारी कार्यालय
५. विद्यापीठ जनसंपर्क कार्यालय
६. संचालक, इंटरनेट केंद्र (सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर General Administration Circular या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात यावे.)